महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कोल्हापूर

जुना पुणे - बेंगलोर रोड, शिवाजी विद्यापीठ जवळ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४. (महाराष्ट्र)
ईमेल : gcoekolhapur@gmail.com, office.coekolhapur@dtemaharashtra.gov.in
वेबसाईट : www. gcoekolhapur.ac.in ☎ : ०२३१-२५२१०३८

AICTE Permanent ID : 1-43363660274 DTE Code : 6036 Establishment Year : 2023

जा.क्र.शाअमको/ग्रंथालय/२०२५/३46 दिनांक :- 23 MAY 2025

प्रति,
सोबतच्या यादीप्रमाणे

**विषय – पुस्तकाचे खरेदी दरपत्रक पाठविणे बाबत**

महोदय,

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,कोल्हापूर संस्थेसाठी ग्रंथालय विभागाकरीता आर्थिक वर्ष २०२५ -२०२६ करिता सोबत जोडलेल्या प्रकाशकांच्या यादीप्रमाणे पुस्तकांची खरेदी करण्यासाठी दरपत्रक मागविण्यात येत आहे. तरी आपले डिस्काउंटचे दर सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे भरुन संस्थेत दिनांक ०३/०६/२०२५ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावे. प्राप्त झालेली दरपत्रके शक्य झालेस दिनांक ०४/०६/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. प्राचार्य यांच्या कक्षात उघडण्यात येतील

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे -**

१) प्रकाशकांची यादी सोबत जोडलेली आहे. नमुद केलेल्या प्रकाशकानुसार सवलतीचे दर दरपत्रकात नमुद करण्यात यावे प्रकाशकांची यादी व डिस्काउंट दर हे सप्लायर नि स्वतःच्या लेटर हेड वर नमूद करून सही व शिक्का असणे आवश्यक आहे

२) सदरची पुस्तके या संस्थेमधील ग्रंथालय विभागामध्ये पोहोच करणेसहीत दर देण्यात यावेत.

३) सदर पुस्तकाचे माहितीपत्रक (उपलब्ध असलयास) दरपत्रकासोबत जोडण्यात यावे.

४) सदर पुस्तकाचे दर हे दरपत्रक उघडण्यात आलेल्या दिनांकापासून सहा महीने पर्यंत वैध असावेत.

५) सदर पुस्तकांच्या नग व संख्येत आवश्यकतेनुसार बदल केले जाऊ शकतात.

६) दरपत्रकावर लागू असल्यास GST क्रमांकाचा उल्लेख करावा.

७) दरपत्रके सिलबंद लिफाफयामधूनच पाठवावे. त्यावर वरीलप्रमाणे जावक क्र. दिनांक व "ग्रंथालय शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,कोल्हापूर" करिता दरपत्रके असा उल्लेख लिहावा.

८) ई-मेल व्दारे पाठविण्यात आलेल्या दरपत्रकांचा स्वीकार करण्यात येणार नाही.

९) एक किंवा सर्व दरपत्रके अंशतः अथवा पूर्णतः स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क निम्मस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.

१०) सदर पुस्तकाचे दरपत्रक मंजूर झाल्यानंतरच प्रकाशकानुसार पुरवठा आदेश देण्यात येईल. तसेच आपण आदेश मिळाल्यानंतर ३० दिवसाच्या आत पुस्तके संस्थेत पुरवठा करायाचे बंधन राहील. त्यानंतर पुस्तके पुरवठा केल्यास खाली सही करणा-यांचा निर्णय अंतिम राहील तसेच आपले राष्ट्रीयकृत बॅकेमध्ये खाते असणे आवश्यक आहे.

११) परदेशी चलनाचे दर Good Office Committee चे मार्गदर्शनाप्रमाणे देण्यात येईल.

१२) आपण देयकासोबत सादर केलेला PAN चालू स्थितीत नसेल व भविष्यात त्या संबंधी आयकर विभागाकडून दंड या संस्थेस आकारण्यात आल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील.

१३) दरपत्रकाबाबत काही कायदेशीर अडचणी आल्यास कोल्हापूर कार्यकक्षात याची अमलबजावणी केली जाईल.

१४) ज्या पुरवठादारांचा डिस्काउंटचा दर जास्त प्रकाशनाकरीता येईल, त्यांना उर्वरीत प्रकाशनाकरीता पुस्तकांचा पुरवठा करण्याकरीता अन्य पुरवठादारांचा आलेला ज्यादाचा डिस्काउंट नुसार चर्चेव्दारे आदेश देण्यात येतील.

१५) दिनांक २३ /०४ /२०२५ ला प्रसिद्ध झालेल्या दरपत्रकानुसार मुदतीत प्राप्त झालेले दरपत्रके ग्राह्य धरण्यात येतील.

१६) किमान दोन शासकीय शैक्षणीक संस्थाना मागील दोन वर्षात (२०२३-२४, २०२४-२५)पुस्तकांचा पुरवठा केल्याची प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे

(कॅप्टन डॉ. नितीन पां. सोनजे)
प्राचार्य,
शासकिय अभियांत्रिकी,महाविद्यालय,कोल्हापूर

**सोबत - प्रकाशकांची यादी**

प्रत- १) **शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,कोल्हापूर** नोटीस बोर्ड व संकेतस्थळावर.

| SR.NO | Name of Publisher | Discount % |
| --- | --- | --- |
| 1 | Elsevier Publisher | |
| 2 | Tata Mc-Grow Hill | |
| 3 | Pearson Education | |
| 4 | Oxford Publisher | |
| 5 | Prentice hall of India, New Delhi | |
| 6 | Central Publishing Home Allahabad | |
| 7 | Khanna Publication | |
| 8 | Chapman | |
| 9 | Wiley | |
| 10 | Cambridge University | |
| 11 | MIT Press | |
| 12 | Shri Lakshmi Publication | |
| 13 | SAE International Pub. | |
| 14 | S Chand Pub. | |
| 15 | Dreamtech | |
| 16 | CRC Press | |
| 17 | Springer | |
| 18 | Dhanpat Rai & co. | |
| 19 | New Age international | |
| A | Other than above National Publication | |
| B | Other than above International Publication | |

| Name of the Vender | Address of the Vender |
| --- | --- |
| | |

Government College of Engineering, Kolhapur ★ LIBRARY